ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# महिला सबलीकरण कार्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान

कुणाल दिलीप राठोड
राज्यशास्त्र विभाग

★★★

**प्रास्ताविक** – परमपूज्य, विश्वरत्न, भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म 14 एप्रिल 1891 रोजी रत्नागिरी जिल्ह्यात आंबेवडे येथे एका दलित कुटुंबात झाला. त्यांचे वडील रामजी सकपाळ हे सैन्यात होते. त्यांची आई भिमाबाई या बाबासाहेबांच्या लहानपणीच दिवंगत झाल्या होत्या. डॉ. बाबासाहेबांना दलितांच्या उन्नतीची आणि समाज सुधारणेची प्रेरणा त्यांच्या वडिलांकडून मिळाली. आंबेडकरांना घरातल्या वातावरणामुळे शिक्षणाची संधी मिळाली परंतु विशम समाजरचनेचे चटके त्यांना सहन करावे लागले.

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली येथे प्राथमिक व सातार्‍याच्या सरकारी शाळेत त्यांचे माध्यमिक शिक्षण झाले. शैक्षणिक कालखंडात अनेक अवमानकारक प्रसंगांना त्यांना तोंड द्यावे लागले. जन्म अनिष्ट विषमतेवर आधारित समाज व्यवस्थेबद्दल त्यांच्या मनात चीड निर्माण झाली आणि हीच सामाजिक विषमता त्यांच्या समाज सुधारणेच्या कार्यात प्रेरणादायी ठरली असे म्हटल्यास काही वावगे ठरणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पहिले भारतीय होते ज्यांनी महिलांच्या प्रगतीच्या मार्गातील अडथळे दूर केले. त्यांनी हिंदूंसाठी आणि भारतीय समाजातील इतर घटकांकरिता समान नागरी कायद्याचे संहितीकरण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. त्यांचे म्हणणे होते की स्त्रियांचा सर्वांगीण विकास होणे महत्त्वाचे आहे व स्त्रियांना सामाजिक शिक्षण दिले पाहिजे.डॉ. आंबेडकरांचा नेहमीच महिलांच्या चळवळीला पाठिंबा होता आणि त्यांचा असा विश्वास होता की समाजाच्या सर्व स्तरांतून महिलांचा सहभाग लाभल्यास त्या सामाजिक सुधारणांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे** –१) महिला सबलीकरण कार्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अभ्यासणे .२) महिला सबलीकरणाचे महत्व समाजातील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविणे. ३) जास्तीत जास्त महिला सबलीकरण समाजात व्हावे यासाठी जनतेला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करणे.

**संशोधन पद्धती** – प्रस्तुत शोध अध्ययनासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर करुन तर त्याचे संकलन करण्यात आलेले आहे. अध्ययन विषयाशी संबंधित दुय्यम तथ्य संकलित करण्यासाठी प्रकाशित ,अप्रकाशित असलेले शोध अध्ययन संदर्भ ग्रंथे, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे, संशोधन पत्रिका इत्यादी दुय्यम स्त्रोत्रा च्या माध्यमातून संकलित करण्यात आलेले आहे.

**आशय विश्लेषण** – डॉ. बाबासाहेबांचा स्त्री–पुरुश समानतेचा आग्रह होता. स्त्री पुरुष समानता प्रस्थापित होण्यासाठी स्त्री शिक्षणाचा मार्ग त्यांनी सांगितला. त्यांचे स्त्री शिक्षणा बद्दल चे विचार हे त्यांनी शिक्षण घेत असताना लिहिलेल्या प्रबंधातून व त्यांनी केलेल्या पत्रव्यवहारातून दिसते. अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाची एम.ए. ची पदवी संपादन करताना डॉ. आंबेडकर यांनी दोन प्रबंध वाचले त्यातील पहिला प्रबंध "प्राचीन भारतातील व्यापार" तर दुसरा होता प्राचार्य गोल्डनवेझर यांच्या वाद–कथा सभेत वाचलेला "भारतीय जातीसंस्था, तिची उत्पत्ती आणि वाढ" यात त्यांनी म्हटले आहे की मनू हा स्त्री द्वेष्टा होता, स्त्री जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन संकुचित असल्यामुळे मनुस्मृती मधील स्त्रियां बद्दल चे विचार हिंदू स्त्रीच्या अवनतीस कारणीभूत ठरला. ह्या प्रबंधावरुन डॉ. आंबेडकर यांच्या मनाचा कल कळून येतो. याच काळात अमेरिकेत अध्ययन करीत असताना त्यांनी वडिलांच्या मित्राला लिहिलेल्या पत्रात एक महत्त्वाचा मुद्दा मांडला तो म्हणजे, "आईबाप मुलांना जन्म देतात, कर्म देत नाहीत हे म्हणणे ठीक नाही. आईबाप मुलांच्या आयुष्याला वळण लावू शकतात ही गोष्ट आपल्या लोकांच्या मनावर बिंबवून जर आपण मुलाच्या शिक्षणाबरोबरच मुलींच्याही शिक्षणासाठी धडपड केली तर आपल्या समाजाची प्रगती झपाट्याने होईल." या खोल विचारात त्यांच्या भावी कार्याचे बीज आहे.

अमेरिकेतील शिक्षण पूर्ण झाल्यावर आपले विचार प्रत्यक्षात उतरवण्यासाठी डॉ.आंबेडकर यांनी आपली चळवळ 1920 मध्ये सुरू केली ते म्हणाले, "आम्हाला लवकरच चांगले दिवस दिसतील, जर पुरुश शिक्षणाबरोबरच स्त्रीयांच्या शिक्षणाची बाजू घेतल्यास या कार्यास गती येईल." त्यांनी हिंदु सामाजिक व्यवस्थेविरोधात प्रचार करण्यासाठी 1920 मध्ये 'मूकनायक' व 1927 मध्ये 'बहिष्कृत भारत' नावाचे पाक्षिक सुरु केले. त्यांच्या मुद्द्यांमधून त्यांनी लैंगिक समानता, स्त्री शिक्षणावर जोर दिला व त्यांच्या समस्या उघडकीस आणल्या डॉ. आंबेडकर यांची महिलांच्या प्रश्नाविषयी धारणा शिक्षणाच्या अधिकारावर पुरुषांप्रमाणे समान वागणूक, मालमत्तेचा हक्क आणि राजकीय प्रक्रियेत सहभाग हा सध्याच्या काळातील सुद्धा स्त्रीवादयांच्या मागणीप्रमाणे आहे.त्यांच्या या कार्यात पत्नी रमाबाई यांनी सुद्धा सहभाग घेतला. डॉ. आंबेडकर यांनी पत्नी रमाबाई समवेत जानेवारी 1928 मध्ये 'विमेन्स असोसिषन' या संघटनेची मुंबई मध्ये स्थापना केली. याच प्रमाणे महिलांनी सुद्धा उस्फूर्तपणे त्यांच्या या कार्यात सहभाग घेतला. 1931 मधील नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहात पाचशे महिला उपस्थित होत्या आणि त्यापैकी पुष्कळ महिलांना

पुरुषांसह अटक करून त्यांना तुरुंगात ठेवण्यात आले. डॉ. आंबेडकर यांच्या प्रोत्साहनाने 1931 मध्ये राधाबाई वडाळे या पत्रकार परिषदेत म्हणाल्या, "अपमानाने जीवन जगण्यापेक्षा शंभर वेळा मरणे बरे. आपण आपल्या जीवाचे बलिदान देऊनही हक्क मिळवा." महिलांच्या या आत्मसन्मानाचे व दृढ निश्चय याचे श्रेय आंबेडकरांना जाते. डॉ. आंबेडकरांनी महिलांच्या सामर्थ्यावर आणि समाज सुधारण्याचा प्रक्रियेत त्यांच्या भूमिकेवर विश्वास ठेवला व आपले कार्य करीत राहिले. महाड येथील ऐतिहासिक सत्याग्रहा मध्ये पुरुशांसह तीनशे महिलांचा सहभाग होत्या. सुमारे तीन हजार महिलांच्या दुसऱ्या बैठकीस संबोधित करताना ते म्हणाले, "मी समाजाची प्रगती मोजण्यासाठी त्या समाजातील महिलांची प्रगती पाहतो. ज्या मुलीने लग्न केले आहे त्या मुलीने तिच्या पतीच्या बाजूने मित्राप्रमाणे उभे राहिले पाहिजे. तसेच त्याचा गुलाम होण्यास नकार दिला पाहिजे. मला खात्री आहे की आपण या असल्याचे अनुसरण केल्यास तुम्ही स्वतःप्रत सन्मान व गौरव प्राप्त कराल."

स्त्रियांना समाजात समान दर्जा आणि चांगली वागणूक मिळाली पाहिजे. स्त्रीशिक्षणामुळे कुटुंब सुधारते, घरातील स्त्रीच जर आडाणी असेल तर कुटुंबाची उन्नती होत नाही. म्हणून स्त्रियांचा जीवनमान सुधारण्यासाठी आणि कुटुंबाला नैतिक वळण लावण्यासाठी स्त्रियांना शिक्षण देणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. तत्कालीन समाजात स्त्रियांचे कार्यक्षेत्र फक्त घरा पुरतेच मर्यादित होते त्यामुळे त्यांच्या बौद्धिकतेला आणि गुणवत्तेला अजिबात वाव मिळाला नाही. स्त्रियांमध्ये चौफेर जागृती निर्माण करण्यासाठी त्यांना शिक्षित करणे अत्यंत आवश्यक आहे. जो पर्यंत महिलांचा विकास होणार नाही महिला सबलीकरण होणार नाही तोपर्यंत राष्ट्राचा विकास होणार नाही असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. हे विचार त्यांनी प्रत्यक्षात उतरवले. डॉ. आंबेडकर यांनी 1942 मध्ये मुंबई विधानसभेत महिलांसाठी कुटुंब नियोजन करण्याच्या उपायासाठी जोरदार प्रयत्न केले. गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी परिषदेत कामगार मंत्री असताना त्यांनी पगारी मातृत्व रजेची योजना अमलात आणली व तसेच हिंदू कोड बिल संसदेत सादर केले आणि महिलांच्या मालमत्तेच्या हक्काच्या मुद्द्यावर प्रकाश टाकला. या विधेयकाला बर्याच राजकीय नेत्यांनी विरोध केला त्यामुळे डॉ.आंबेडकरांनी मंत्रिमंडळातून राजीनामा दिला. नंतर हिंदू कोड बिलाचे चार विधेयकामध्ये विभाजन करण्यात आले, 1) हिंदू विवाह कायदा –1955 2) हिंदू वारसा हक्क कायदा –1956 3) हिंदू अल्पसंख्यांक व पालकत्व कायदा –1956 4) हिंदू दत्तक व देखभाल कायदा –1956 हे चार कायद्यात डॉ. आंबेडकरांनी तयार केलेल्या हिंदू कोड विधेयकातील कल्पना व तत्त्वांचा समावेश होता. आंबेडकरांनी बालविवाहास पूर्ण विरोध केला होता. स्त्रियांनी उत्तम कपडे ,दागिने यासाठी हट्ट न धरता स्वच्छ व ताप टीपीने राहावे. गुणवत्तेवर चारित्र्यावर भर द्यावा. मुला–मुलींवर चांगले संस्कार करावे असा त्यांनी स्त्रियांना उपदेश केला. 'पाकिस्तान व भारताची फाळणी' या त्यांच्या प्रसिद्ध पुस्तकात त्यांनी मुस्लिम महिला आणि त्यांच्या धार्मिक परंपरा जसे बुरखा पद्धत, विवाह इत्यादी परंपरांचा विरोध केला मुस्लिम महिलांवर दडपशाही केलेल्या विविध धार्मिक परंपरा त्यांच्यावर लादण्यात आल्या स्त्रियांची जात, धर्म कोणताही असो डॉक्टर आंबेडकर यांनी सर्व प्रकारच्या अन्याया विरुद्ध वारंवार आवाज उठवला.

6 डिसेंबर 1956 रोजी सकाळी आपले परम वंदनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या सर्वांची सोबत सोडून गेले. डॉ. आंबेडकर यांच्या निधनानंतर संसदेत शोक प्रकट करताना नेहरू म्हणाले, "डॉ.बाबासाहेब आंबेडकर हिंदू समाजाच्या सर्व अत्याचारी गोष्टींच्या विरुद्ध बंडाची प्रतीक म्हणून जास्त आठवले जातील." डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व स्तरातील महिलांच्या जीवनाविषयी मते मांडली त्यांनी सांगितले की महिलांना समान वागणूक व प्रतिष्ठा दिली पाहिजे हिंदू कोड बिल यावर त्यांनी मूलभूत सुधारणा सुचवण्यावर भर दिला व दुरुस्ती करून त्यांनी हे विधेयक मंजूर करून घेण्यासाठी सर्व संसद सदस्यांना आवाहन केले. अखेरीस त्यांना राजीनामा दिला. त्यांचे विचार फक्त स्त्रियांसाठीच नाहीत तर सर्व भारतीयांच्या सर्वांगीण विकासासाठी आहे हे त्यांच्या प्रत्येक वाक्यातून आणि शब्दातून व्यक्त होते.

### संदर्भ

1) *गायकवाड डॉ.ज्ञानराज (2013)– 'महामानव'– रिया पब्लिकेशन,कोल्हापूर.*

2) *कीर धनंजय (1980)– 'विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर' रघुवंशी प्रकाशन ,मुंबई.*

3) *Dr-M-R- Singaria Dr BR Ambedkar and women empowerment in India*& Quest journal-*

4) *Dr- Karnika Dubey ¼2020½& ^B-R- Ambedkar and women empowerment & Palarchs Journal of Archeology of Egypt- "efgyk lcyhdj.k dk;kZr M,- ckcklkgsc vkacsMdjkaps ;ksxnku"*